**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

# माहितीकक्ष, दि.२५ ऑगस्ट २०२५

# ईद-ए-मिलाद २०२५- शांतता कमिटी बैठक

---

मा.पोलीस आयुक्त श्री.एम.राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली ईद-ए-मिलाद (मोहम्मद पैगंबर जयंती) २०२५ चे अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि. २५/०८/२०२५ रोजी १६.०० वा. पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य, सोलापूर महानगरपालिकेकडील अधिकारी, ईद-ए-मिलाद (मोहम्मद पैगंबर जयंती) २०२५ उत्सवाचे पदाधिकारी,सदस्य,यांची पोलीस आयुक्त कार्यालय येथे संयुक्तपणे बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीची प्रस्तावना श्री. प्रताप पोमण, सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१ यांनी करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला.

ईद-ए-मिलाद (मोहम्मद पैगंबर जयंती) २०२५ उत्सवाच्या पार्श्वभुमीवर कोणीही विनापरवाना मिरवणूक काढणार नाही, मिरवणुक मार्गावरील धार्मिकस्थळे विशेष:त लहान मोठी मंदीरासमोर नाच-गाणीकरू नयेत अथवा मंदीरांवर आक्षेपार्ह चिज-वस्तू फेकू नये नागरीकांनी कोणत्याही स्थितीत चुकीच्या अफवांवर विश्वास न ठेवता सामंजस्याने वागावे. ईद-ए-मिलाद (मोहम्मद पैगंबर जयंती) साजरा करतेवेळी सार्वजनिक रस्त्यावर अडथळा होऊ नये याची खबरदारी घ्यावी, सोशल मिडीयाव्दारे कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, व्हिडीओ फॉरवर्ड न करता ते डिलीट करुन जातीय सलोखा अबाधित राखावा. एखादी अप्रिय अथवा चुकीची घटना आजूबाजूला घडत असल्यास स्थानिक पोलीस ठाणे किंवा नियंत्रण कक्ष येथे त्वरीत माहिती द्यावी.कोणत्याही धार्मिकस्थळी आक्षेपार्ह भाष्य/वक्तव्य केले जाणार नाही याची संबंधितांनी खबरदारी घ्यावी. उपरोक्तसुचनांचे पालन करुन कायदा व सुव्यवस्था राखणेकामी सर्वांनी सहकार्य करावे.

त्यानंतर बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या.त्या नंतर सदर सुचनेचे संबंधित महानगरपालिका, महावितरण, आर टी ओ, अशा खात्याचे अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघुन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले.

मा.पोलीस उप-आयुक्त(मुख्यालय) साो यांनी बैठकीस उपस्थित लोकांचे स्वागत करुन मांडलेल्या अडी-अडचणीचे निरसण केले. उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परीसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलीसांना दिली पाहिजे. मिरवणुकीमध्ये अफवा पसरवू नये, नियमांचे पालन करावे, नियमांचे पालन नाही झाले तर कायदेशीर कारवाई होईल. शासनाने नेमून दिलेल्या सुचना पाळल्या पाहिजेत. तसेच योग्य तो बंदोबस्त नेमू असे सांगून ईद-ए-मिलाद (मोहम्मद पैगंबर जयंती) २०२५ शुभेच्छा देवून बैठकीला उपस्थितांचे आभार मानले.

सदर बैठकीस, मा.श्री गौहर हसन, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मा.श्रीमती डॉ.अश्विनी पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.विजय कबाडे, पोलीस उप आयुक्त (परीमंडळ), श्री पोमण सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१, श्री खिरडकर, विभाग-२, श्री राजन माने, गुन्हे शाखा श्री.खिरडकर, वाहतुक शाखा, सोलापूर महानगर पालिकेकडील अधिकारी, महावितरण,आर.टी.ओ.चे अधिकारी तसेच सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार,व शांतता कमिटीचे सदस्य, व पत्रकार बंधु उपस्थित होते.

तरी उपरोक्त प्रमाणे शांतता समिती सदस्य यांचे समवेत घेण्यात आलेल्या बैठकीतील ठळक मुद्यांबाबत आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दी करुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.